# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**४३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.०१.०९.२०२६ जिल्हा: नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२६/०८/२०२६ ते ०१/०९/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०२/०९/२०२६ ते ०६/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | दिनांक | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| १४.४ | १.२ | २१.४ | २२.७ | १४.२ | ६.४ | ७.५ | पाऊस (मिमी) | ५ | ६ | ८ | ७ | ४ |
| २४.८ | २६.० | २६.४ | २५.० | २४.८ | २६.५ | २६.२ | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २८ | २७ | २६ | २७ |
| २२.५ | २२.५ | २२.० | २२.१ | २२.० | २२.४ | २२.१ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २३ | २३ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९५ | ९२ | ९५ | ९६ | ९७ | ९७ | ९६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९० | ९१ | ९२ | ९२ |
| ८८ | ७१ | ८९ | ९३ | ८७ | ९२ | ९५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ७९ | ८० | ८६ | ८२ |
| ५.४ | ७.३ | ६.७ | ४.८ | ११.१ | ८.३ | ७.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १६.० | १५.५ | १४.२ | १५.३ | १३.५ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात तुरळक हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहिल. कमाल तापमान २६-२८ डिग्री सें. व किमान तापमान २२-२३ डिग्री सें. दरम्यान राहण्याची श.क्यता आहे. तसेच वा-याचा वेग १३-१६ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता/इशारा:** | | **इशारा नाही** |
| **सामान्य सल्ला** | | जिल्ह्यातील हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता खरीप पिके, भाजीपाला, फळपिके व चारा पिकांना शक्य असल्यास सिंचनासाठी ठिबक / तुषार सिंचन पद्धत वापरावी. पिकांना सायंकाळी पाणी द्यावे.<br>उपलब्ध जलसंपत्तीतच सिंचन सुविधांची व्यवस्था करावी.<br>पाण्याचा तोटा टाळण्यासाठी, शेतातुन तण काढा त्या तणाचा वापर आच्छादनासाठी केला जाऊ शकतो त्यामुळे मातीचा ओलावा टिकून राहील.<br>जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी, मातीच्या पृष्ठभागावरील कवच तोडण्यासाठी आणि मातीची धूळ तयार करण्यासाठी तण काढून, कोळपणी किंवा आांतरमशागती सारखे कामे करा.<br>नत्रयुक्त खतांचा आणि सूक्ष्म पोषक द्रवांचा वापर दुष्काळ परिस्थितीत पिकांची कार्यक्षमता वाढवते.<br>मुग व उडिद- पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्हाच्या पूर्व व मध्य विभागातील अवर्षणप्रवण, मैदानी क्षेत्रातील मुग व उडिद पिकांना संरक्षित पाणी द्यावे. किंवा फुलावस्थेत २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी यामुळे पिकातील बाष्प उत्सर्जन कमी होते व पाण्याचा ताण बसत नाही वेल वर्गीय पिके |
| **संदेश** | | **हलक्या पावसाचा अंदाज लक्षात घेता, सल्ला देण्यात येतो कि खरीप पिकांसाठी सूक्ष्मसिंचन, आच्छादन व आंतरमशागत पद्धतीचा अवलंब करावा तसेच नत्रयुक्तखते, बाष्प उत्सर्जन कमी करणारे आणि सूक्ष्मपोषक द्रवांचा वापर करावा.** |
| **भात** | वाढीची अवस्था/ फुटवे फुटण्याची अवस्था | पाणी व खत व्यवस्थापन :<br>भात खाचरात पिकाच्या योग्य वाढीसाठी रोपांच्या अधिक फुटव्याच्या अवस्थेत पाण्याची पातळी ३ ते ५ सेमी असावी.<br>नत्रयुक्त खते प्रमाणापेक्षा जास्त टाकू नयेत अन्यथा करपा रोगाचे प्रमाण वाढते.<br>भात पिकासाठी शिफारस केलेला अन्नद्रव्यांचा डोस शक्यतो युरिया- डीएपी ब्रिकेटच्या द्वारे द्यावा. |
| **नाचणी/नागली व वरई** | वाढीची अवस्था/ फुटवे फुटण्याची अवस्था | लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ-डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त: नाचणी पिकावरील पाने खाणारी अळीसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बांधावरील गवत व तण उपटून नष्ट करावे.<br>एक खुरपणी / निंदनी आणि दोन कोळपणी करणे. |
| **खुरासणी** | वाढीची अवस्था | पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता खुरासणी पिकाची पेरणी नंतर ५० दिवसांनी शेंडा खुडावा त्यामुळे झाडावरील फांद्यांची संख्या वाढून उत्पादनात वाढ होईल. तसेच खुरासणी पिकात पाने खाणारी अळी आढळून आल्यास क्लोरोपायरीफॉस २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मका** | वाढीची अवस्था | हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता आंतरमशागतीची व तणनियंत्रणाची कामे करावीत.<br>पाणी व्यवस्थापन<br>मका पिकाची पाने रुंद व लांब असल्यामुळे बाष्पीभवन क्रियेद्वारे पानातून अधिक पाणी बाहेर टाकले जाते. परिणामी मका पिकास पाण्याची गरज जास्त असून, पावसात खंड पडल्यास महत्त्वाच्या अवस्थेत (जसे कि रोप अवस्था – २५–३० दिवस, तुरा बाहेर पडताना – ४५–५० दिवस, फुलोरा – ६०–६५ दिवस व दाणे भरणे – ७५–८० दिवस ) संरक्षित पाणी द्यावे. |
| **सोयाबीन** | वाढीची अवस्था/ फुले लागणेची अवस्था | किड-रोगांच्या प्रादुर्भावाकरिता पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे. सोयाबीन पिकातील मोठे तण हाताने उपटून काढावे. सततच्या ढगाळ हवामान परिस्थितीमुळे सोयाबीन पिकावर किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याकारणामुळे, सोयाबीनवरील तंबाखूवरील पाने खाणारी अळी, घाटे अळी, उंट अळी, खोड माशी, चक्री भुंगा या किडींच्या नियंत्रणासाठी, थायमिथोक्झाम (१२.६%) + लॅमडा सायहॅलोथ्रिन (९.५% झेडसी) हे संयुक्त कीटकनाशक ०.२५ मि.लि. किंवा क्लोरअँट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रामाणात फवारणी करावी. |
| **भुईमुग** | फुलोरा / आऱ्या सुटणे अवस्था | खरीप भुईमुगास फुले येण्याची अवस्था (पेरणीनंतर २५ ते ३० दिवस ), आऱ्या सुटण्याची अवस्था (३५ ते ४५ दिवस) आणि शेंगा पोसण्याची अवस्था (६५ ते ७० दिवस) या अवस्थांमध्ये पावसाने ताण दिल्यास संरक्षित पाण्याची पाळी द्यावी. नंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने १० ते १२ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| **बाजरी** | वाढीची अवस्था | दोन वेळा कोळपणी आणि गरजेनुसार एक ते दोन वेळा खुरपणी करावी. एकात्मिक तण नियंत्रण पद्धतीमध्ये अॅट्राझिन तणनाशकाची १.० किलो प्रति हेक्टरी पेरणीनंतर परंतु पीक व तण उगवण्यापूर्वी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व एक खुरपणी पेरणीनंतर २५- ३० दिवसांच्या आत करावी. |
| **द्राक्ष** | | बऱ्याच बागेत चुनखडी कमी अधिक प्रमाणात आढळून येते. चुनखडीचे प्रमाण ३ टक्क्यांपासून २२ टक्क्यांपर्यंत आढळते. काही बागेमध्ये पाण्यामध्ये क्षारही तितक्याच मात्रेत दिसून येतात. यामुळे वेलीच्या वाढीवर, फळछाटणीनंतर उत्पादनावर परिणाम होताना दिसून येतात. फळछाटणीपूर्वी पाणी आणि माती परिक्षण केल्यास मात्र या अडचणीवर मात करणे शक्य आहे. |
| **डाळिंब** | | फळांतील रस शोषणारा पतंग<br>बागेत व बागेच्या आजुबाजूला गुळवेल, वासनवेल, घाणेरी, एरंडी या यजमान वनस्पति असतील तर काढून टाकाव्यात.<br>बागेतील गळून पडलेली व कुजणारी फळे गोळा करून गाडून टाकावीत.<br>फळांतील रस शोषणाऱ्या पतंगांनी छिद्र पाडलेली फळे काढून टाकू नयेत. कारण पतंग पुन्हा त्याच फळावर बसेल व दुसरे फळ खराब करणार नाही. मात्र अशा फळांची कूज टाळण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>मर्यादित क्षेत्रावर सूर्यास्तानंतर टॉर्च व हातातील नेटच्या साह्याने फळांतील रस शोषणारे पतंग पकडून मारून टाकावेत.<br>बागेच्या प्रत्येक कोपऱ्यावर १५०-२०० वॅट फ्लूरोसंट दिवे एकमेकांकडे तोंड करून उभारावेत. |
| **आंबा** | | झाडावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास प्रादुर्भावग्रस्त ठिकाणची साल उभी तडकल्यासारखी दिसते. त्यामध्ये पांढरट बुरशीची वाढ झालेली दिसते. फांदी शेंड्याकडून वाळत जाते. नवीन लागवड केलेल्या बागांमध्ये मुख्य खोडावर प्रादुर्भाव दिसून येतो.<br>नियंत्रणासाठी फांद्या प्रादुर्भावग्रस्त भागाच्या दोन ते तीन इंच खाली कापून नष्ट कराव्या. कापलेल्या भागावर बोर्डो पेस्ट लावावी. पावसाची उघडीप असताना १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्झिक्लोराइड २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे खोड व फांद्या व्यवस्थित भिजतील, अशी फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **खरीप कांदा** | | नत्र खताचा पहिला हप्ता १० किलो प्रति एकर या प्रमाणात पुनर्लागवडीनंतर ३० दिवसांनी द्यावा. पुनर्लागवडीनंतर ४० ते ६० दिवसांनी खुरपणी करावी. नत्र खताचा दुसरा हप्ता १० किलो प्रति एकर या प्रमाणात पुनर्लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावा. पुनर्लागवडीनंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी फवारणीद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-II ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात द्यावे. नत्राच्या कमतरतेमुळे पाने पिवळी पडली असल्यास, युरिया १० ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. |
| **टोमॅटो** | | फुलगळ<br>टोमॅटो पिकाची फुलगळ प्रामुख्याने जास्त तापमान, जास्त आर्द्रता, मंद प्रकाश, वेगवान व कोरडे वारे, पाण्याचा ताण, रोग व किडींचा प्रादुर्भाव तसेच पिकांमधील वाढ संप्रेरकांत होणारे अवांच्छित बदल इत्यादी कारणांमुळे होते.<br>टोमॅटोची फुलगळ टाळण्यासाठी वरील सर्व बाबींचे योग्य व्यवस्थापन व नियंत्रण करणे गरजेचे आहे. तसेच तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार एन.ए.ए. या वाढ संप्रेरकाच्या २० पीपीएम द्रावणाची फक्त फुलोऱ्यावर फवारणी करावी. |
| **पशुधन (गाय व म्हैस)** | | आहार व्यवस्थापन<br>पावसाळ्यात वातावरणातील थंडपणा वाढतो. थंड हवामानात जनावरांना अधिक ऊर्जा लागते. अशावेळी जनावरांना अतिरिक्त कोरडा चारा दिल्यास या चाऱ्याचे जनावरांच्या पोटामध्ये ज्वलन होते. या ज्वलनामुळे गाई, म्हशींना त्यांचे शरीर गरम ठेवण्यासाठी ऊर्जा मिळते. त्यामुळे जनावरे वातावरणाशी सहजरीत्या जुळवून घेतात.<br>यामुळे पावसाळ्यामध्ये जनावरांच्या आहारात कोरड्या चाऱ्याचा समावेश केला पाहिजे. अतिरिक्त ऊर्जा असणारा मका भरडा, गहू, बाजरीचा भरडा यांसारखा ऊर्जायुक्त पशुआहार जनावरांच्या आहारामध्ये अर्धा ते एक किलो वाढवावा. बायपास फॅट १०० ग्रॅम द्यावा. त्यामुळे दूध उत्पादन टिकून राहते. |
| **शेळी** | | आरोग्य व्यवस्थापन<br>शेळ्यांना पावसाळ्याअगोदर व पावसाळ्यानंतर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळापत्रकानुसार लाळ्या खुरकूत, आंत्रविषार, घटसर्प व पीपीआर या रोगांच्या प्रतिबंधक लसी देऊन घेणे आवश्यक आहे.<br>मे व सप्टेंबर महिन्यात शेळ्यांना त्यांच्या वजनानुसार जंतनाशकाची योग्य मात्रा देऊन जंत निर्मूलन करून घ्यावे. ढगाळ व दमट हवामान जंतांच्या वाढीसाठी पोषक असते.<br>शेळ्यांना लस कधीही रोग आल्यानंतर देऊ नये, कारण आजारी व विशिष्ट रोगाच्या साथीमध्ये रोग झालेल्या शेळीला लस दिल्यास तो रोग बरा न होता बळावतो.<br>पावसाळ्यामध्ये जखमांवर माश्या बसून त्या चिघळणार नाही, याची काळजी घ्यावी व माश्यांचा आवश्यक तो बंदोबस्त करावा. यासाठी कडुनिंब, निरगुडी किंवा करंज पाला यांचा वापर करून शेडचे निर्जंतुकीकरण करावे. |
| **मेंढी** | | ऑगस्टमधील मेंढ्यांतील व्यवस्थापन<br>मेंढ्या व मेंढे नरांची वाढलेली खुरे कापावीत.<br>मेंढ्यांची खुरे आठवड्यातून दोनवेळेस कॉपर सल्फेटच्या द्रावणांनी धुऊन घ्यावीत.<br>दूध देणाऱ्या मेंढ्यांना प्रती मेंढी ३०० ग्रॅम पशुखाद्य द्यावे.<br>नवजात कोकरांची योग्य काळजी घ्यावी.<br>सर्व मेंढ्यांना लाळ्या खुरकुत रोगाचे लसीकरण करावे. |
| **कुक्कुटपालन** | | पावसाळ्यामधील परिणाम<br>पिण्याचे पाणी गढूळ व शेवाळयुक्त होते. त्यात निरनिराळ्या रोगकारक जंतूंची वाढ होते.<br>कॉक्सिडिऑसिस रोगाच्या एकपेशीय जंतूंचे प्रमाण वाढते. कोंबड्यांना रक्ती हगवण येते.<br>शेडमध्ये तसेच वळपास माशांचा प्रादुर्भाव होतो.<br>शेडमधील वाढलेल्या अमोनियामुळे डोळ्यांना त्रास होतो, श्वसन संस्थेचे आजार होतात.<br>ओल्या व दमट लिटरमुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो.<br>पावसाचे पाणी शेडमध्ये आल्याने लिटर ओले होते. आर्द्रतेचे प्रमाण वाढते. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान: ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : ०१.०९.२०२६

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**